ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 11 | JULY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतातील पहिल्या महिला संपादिका : तानुबाई बिर्जे



**वृषसेन विनायक धनके**
**मु. पोस्ट वैराग, तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर.**

**सारांश (Abstract)**

भारतीय पत्रकारितेच्या इतिहासात स्त्रियांचा सहभाग उशिरा आणि अत्यंत संघर्षातून घडून आलेला आहे. १९व्या शतकातील जातीय विषमता, स्त्री-अशिक्षण, धार्मिक बंधने आणि पुरुषप्रधान सामाजिक रचना यांमुळे स्त्रियांना सार्वजनिक क्षेत्रात प्रवेश मिळणे अत्यंत कठीण होते. अशा परिस्थितीत तानुबाई बिर्जे यांनी 'दीनबंधू' या सत्यशोधक विचारसरणीच्या वृत्तपत्राचे संपादन स्वीकारून इतिहास घडवला. त्या केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतातील पहिल्या महिला संपादिका ठरल्या. प्रस्तुत संशोधन-लेखामध्ये तानुबाई बिर्जे यांचे जीवन, सामाजिक पार्श्वभूमी, पत्रकारितेतील कार्य, सत्यशोधक चळवळीतील योगदान, स्त्री-सशक्तीकरणातील भूमिका आणि त्यांच्या कार्याचा ऐतिहासिक व वैचारिक प्रभाव यांचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे.

## १. प्रस्तावना

भारतीय समाजरचनेत पत्रकारिता ही केवळ बातम्यांचे वहन करणारे माध्यम नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन राहिले आहे. विशेषतः महाराष्ट्रात १९व्या शतकात उभ्या राहिलेल्या समाजसुधारणा चळवळींनी पत्रकारितेला वैचारिक अधिष्ठान दिले. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी यांसारख्या विचारवंतांनी पत्रकारितेचा वापर सामाजिक अन्यायाविरुद्ध केला.

मात्र, या संपूर्ण पत्रकारितेच्या इतिहासात स्त्रियांचा सहभाग अत्यल्प होता. स्त्रियांना शिक्षण, लेखन आणि सार्वजनिक व्यासपीठापासून दूर ठेवले जात होते. अशा परिस्थितीत तानुबाई बिर्जे यांचे संपादकपद स्वीकारणे हे केवळ वैयक्तिक यश नसून सामाजिक क्रांतीचे पाऊल होते.[1]

### 19 व्या शतकातील सामाजिक पार्श्वभूमी :

19 व्या शतकात महाराष्ट्र हा जातिव्यवस्था, बालविवाह, विधवांचे दमन, स्त्री-अशिक्षण आणि अंधश्रद्धां आणि कर्मकांड यांनी ग्रासलेला होता. शिक्षण हे उच्चवर्णीय/ उच्च जातीय पुरुषांचे मक्तेदारीचे क्षेत्र होते. स्त्रियांनी शिकणे म्हणजे धर्मविरोधी कृत्य मानले जात होते.[2]

महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री-शिक्षणाचा पाया घातला. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समता, बंधुता आणि न्याय यांचा प्रचार केला गेला. पत्रकारिता ही या विचारांची वाहक बनली. 'दीनबंधू' हे वृत्तपत्र या चळवळीचे मुखपत्र होते.[3]

### तानुबाई बिर्जे यांचे बालपण व शिक्षण :

तानुबाई बिर्जे यांचा जन्म इ.स. १८७६ साली पुणे येथे झाला. त्यांचे कुटुंब सत्यशोधक विचारांनी प्रभावित होते. लहानपणापासूनच त्यांना सामाजिक प्रश्नांबाबत जागरूक वातावरण लाभले. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या शाळेत शिक्षण घेतले, ही बाब त्यांच्या वैचारिक जडणघडणीस अत्यंत महत्त्वाची ठरली.[4]त्या काळात स्त्रियांचे शिक्षण केवळ अक्षरओळखपुरते मर्यादित होते; परंतु तानुबाईंनी वाचन, लेखन आणि सामाजिक चिंतनात प्रावीण्य मिळवले.

### सत्यशोधक पद्धतीने विवाह :

तानुबाई यांचा विवाह २६ जानेवारी १८९३ रोजी वासुदेवराव बिर्जे यांच्याशी सत्यशोधक पद्धतीने झाला. या विवाहात ब्राह्मणी विधी नाकारले गेले.[5] वासुदेवराव बिर्जे हे 'दीनबंधू' वृत्तपत्राचे संपादक होते. या सहवासामुळे तानुबाईंना पत्रकारितेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. वृत्तपत्राचे काम, लेखन, मुद्रण, वितरण या सर्व प्रक्रियांशी त्या परिचित झाल्या.

### 'दीनबंधू' वृत्तपत्राचा इतिहास :

'दीनबंधू' हे वृत्तपत्र १८७७ साली सुरू झाले. त्याचे उद्दिष्ट बहुजन समाजाला जागृत करणे, जातीय अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि शिक्षणाचा प्रसार करणे हे होते.[6] हे वृत्तपत्र सत्यशोधक समाजाचे प्रमुख व्यासपीठ होते. शेतकरी, कामगार, स्त्रिया आणि दलित समाज यांच्या प्रश्नांना येथे प्राधान्य दिले जात होते.

### तानुबाई बिर्जे संपादकपदाची ऐतिहासिक जबाबदारी :

१९०८ साली वासुदेवराव बिर्जे यांचे अकाली निधन झाले. या घटनेनंतर 'दीनबंधू' बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली. मात्र, तानुबाई बिर्जे यांनी संपादकपद स्वीकारून वृत्तपत्र चालू ठेवण्याचा धाडसी निर्णय घेतला.[7] या निर्णयामुळे त्या भारतातील पहिल्या महिला संपादिका ठरल्या. त्या काळात स्त्रीने संपादक होणे म्हणजे सामाजिक रूढींना थेट आव्हान देणे होते.

## तानुबाई बिर्जे यांची पत्रकारितेतील संबंधीची भूमिका:

तानुबाई बिर्जे यांनी १९०८ ते १९१२ या काळात 'दीनबंधू' चे संपादन केले. त्यांच्या संपादकीय लेखनात केलेली योगदान ठळकपणे स्पष्ट होते.

## अ) स्त्री शिक्षणाला महत्व :

तानुबाई बिर्जे यांनी स्त्री-शिक्षणाला महत्त्व देत आपल्या संपादकीय क्षेत्रात काम करत असताना स्त्री शिक्षणाचे महत्त्व उदाहरणासहित पटवून त्यामुळे स्त्रियांच्या वैयक्तिक जीवनाबरोबरच कुटुंबाच्या जीवनपद्धतीत समाजाच्या जीवनपद्धतीत कसा बदल होतो यासंबंधीचे लिखाण करून त्या माध्यमातून त्यांनी उदाहरणासहित आपले विचार स्पष्ट केलेले आहेत ज्यामुळे 19 व्या शतकामध्ये एक समाजात स्त्री शिक्षणाची चळवळ सुरू झाली त्यामुळेच पुढील काळात भावी आयुष्यात स्त्रियांना शिक्षण हे अतिशय महत्त्वाचे आहे ही बाब समाजामध्ये पोहोचवण्याचे योगदान त्यांनी पार पाडले .

## ब) जातीय विषमता :

भारतात तसेच महाराष्ट्रात तानाबाई बिर्जेच्या काळात जातीय विषमतेचा परम्मोच्य बिंदू गाठलेला होता समाजात मोठ्या प्रमाणात जातीय विषमता असल्याने समाज हा दुभंगलेल्या अवस्थेत होता त्यांच्यातील ऐक्याची भावना नष्ट होऊन उच्चवर्णीय लोक कनिष्ठ वने लोकांवर सामाजिक व धार्मिक बाबीच्या माध्यमातून अन्यायकारक गोष्टी करून घेत होते अशा काळात त्यांनी आपल्या संपादकीय लेखनाच्या माध्यमातून जातीय विषमता कशाप्रकारे घातक आहे समाजाच्या अधुकतीला प्रामुख्याने ही विषमताच कारणीभूत आहे याची जाणीव त्यांनी आपल्या लिखाणातून दाखवून दिले .

## क)अंधश्रद्धा व कर्मकांडाचे प्राबल्य :

१९ व्या शतकात वरिष्ठ वर्णाचे धार्मिक वर्चस्व प्रस्थापित झाले होते धर्माच्या नावाखाली अस्पृश्य दलित स्त्रिया यांच्यावर अन्याय व अत्याचार मोठ्या प्रमाणात केला जात होता त्याला धर्मशास्त्रानुसार परवानगी आहे अशा प्रकारचे विचार रुजवून समाजामध्ये एक प्रकारे धार्मिक विषमता मोठ्या प्रमाणात निर्माण केलेले होती अशा काळात धर्माच्या विरोधात किंवा धर्म प्रबोधनासाठी बोलणेही अतिशय मुलाचे कार्य होते जर कोणी अशा प्रकारचे प्रबोधन करत असेल तर त्याला धर्मातून समाजातून बहिष्कृत केले जात होते अशा काळात आपले धार्मिक वर्चस्व निर्माण करण्यासाठी धर्मशास्त्राचा आधार घेऊन अनेक अंधश्रद्धा कर्मकांड लोकांमध्ये रुजवले जात होते आणि त्याला कोणीही विरोध करू शकत नव्हते अशा काळात तानाबाई बिर्जेसारख्या स्त्रीने धर्मातील अंधश्रद्धा, कर्मकांड कशाप्रकारे चुकीचे आहे आपल्या लेखनातून त्यांनी दाखवून दिले .

## ड) शेतकरी व कामगारांचे प्रश्न :

भारतीय समाजामध्ये शेतकरी व कामगार यांच्या प्रश्नासंबंधी त्या काळात कोणीही आपले मत मांडत नव्हते सर्वसामान्य जनतेचे प्रमाण शेतकरी व कामगार यामध्येच मोठ्या प्रमाणात होते त्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असूनही त्यांच्या

प्रश्नाला कोणीही दाद देत नव्हते अशा काळात तानाबाई बिर्जे यांनी समाजातील शेतकरी व कामगार हा वंचित घटक बाजूला पडला होता त्यांचे प्रश्न आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजामध्ये या घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला .

### इ) सामाजिक समानता :

तानुबाई बिर्जे यांनी सामाजिक विषमतेची जाणीव समाजाला घातक आहे याची जाणीव करून देत समाजामध्ये सामाजिक समानता असल्यास समाजाची प्रगती होऊ शकते ज्यामुळे संपूर्ण व्यवस्थित परिवर्तन होऊ शकते अशी भूमिका मांडण्यात त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजामध्ये समानता असली पाहिजे अशी थांब भूमिका घेतली ज्यामुळे सर्व क्षेत्रात प्रगतीचे वारे वाहू लागतात असे त्यांचे स्पष्ट होत होते. तानुबाई बिर्जे यांचे लेखन स्पष्ट, तर्कसंगत आणि समाजजागृती करणारे होते.[8].

### स्त्री-सशक्तीकरणातील योगदान :

तानुबाई बिर्जे यांनी पत्रकारितेद्वारे स्त्रीला विचारशील, सक्षम आणि आत्मनिर्भर बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्त्रियांना शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक सहभागाचे महत्त्व पटवून दिले.[9] त्या स्वतः पुढच्या पिढीसाठी विशेषतः स्त्रिया साठी उदाहरण ठरल्या. त्यामुळे पुढील पिढीतील महिला पत्रकारांसाठी त्यांनी मार्ग मोकळा केला. स्त्री संपादक म्हणून काम करताना तानुबाईंना सामाजिक विरोध सहन करावा लागला. अनेकांनी त्यांच्यावर टीका केली. परंतु त्यांनी आपले कार्य न थांबवता सामाजिक परिवर्तनासाठी पत्रकारितेचा वापर केला.[10] अशा या महान महिला संपादिका तानुबाई बिर्जे यांचे निधन १९१३ साली झाले. त्यांचे आयुष्य अल्प असले तरी त्यांचे महिला पत्रकार व संपादिका म्हणून भारतीय इतिहासातील योगदान अमूल्य आहे. त्यांनी भारतीय पत्रकारितेत स्त्रियांसाठी एक नवा अध्याय लिहिला.[11]

### निष्कर्ष

१)तानुबाई बिर्जे या पहिल्या महिला संपादिका होत्या .

२) तानुबाई बिर्जे या सामाजिक परिवर्तनाच्या वाहक होत्या.

३) तानुबाई  बिर्जे यांनी समाजामध्ये वैचारिक अधिष्ठान निर्माण केले .

४) तानुबाई बिर्जे यांनी सत्यशोधक समाजाची तत्वे स्वतः अंगीकारण करून त्याची प्रत्यक्ष सुद्धा कार्यवाही केली .

५) तानुबाई बिर्जे यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून समता, बंधुता, न्यायतत्त्वाचा प्रसार व प्रचार केला

६) तानुबाई बिर्जे यांनी स्त्री शिक्षण, रीत समाज, कामगार आणि शेतकरी इत्यादींच्या प्रश्नांना प्राधान्य दिले .

७) तानुबाई बिर्जे यांनी पत्रकारितेला स्त्री-सशक्तीकरणाचे प्रभावी साधन बनवले. भारतीय पत्रकारितेच्या इतिहासात त्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची:

1. कीर, धनंजय – महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र
2. देशपांडे, ग.प्र. – महाराष्ट्रातील समाजसुधारणा
3. फुले, ज्योतिबा – सार्वजनिक सत्यधर्म
4. कोसंबी, मीरा – स्त्री प्रश्न आणि सुधारणा चळवळ
5. ओक, शांता – महाराष्ट्रातील स्त्री चळवळ
6. बिर्जे, वासुदेवराव – दीनबंधू (निवडक अंक)
7. Think Maharashtra – Tanubai Birje Article
8. Postbox India – Tanubai Birje Biography
9. पवार, उर्मिला – स्त्रीवाद आणि समाज
10. Rege, Sharmila – Writing Caste, Writing Gender
11. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर